नियमित दिवाणी दावा क्रमांक १३६/२०१२
पक्षकारांची नांवे — सुरेखा विरुध्द मारुती

**निशाणी क्रमांक ५ खालील आदेश**
**पारीत दिनांक २८ जानेवारी २०१६**

१ प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम १ व २ अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. वादीच्या कथनानुसार दावा मिळकत ही प्रतिवादींच्या वडील दगडू कुदळे यांचे मालकीची व वहीवाटीची होती. प्रतिवादीच्या वडीलांनी दावा मिळकत विक्री करण्याचे ठरवून वादीसोबत दिनांक १६/४/१९९९ रोजी साठेखत केले. वादीने सदर वेळी प्रतिवादीच्या वडीलांना रुपये ९०,०००/— अदा केले होते. उर्वरीत रक्कम खरेदीखताचे वेळी देण्याचे ठरले होते. दावा मिळकत विक्री करणेसाठी परवानगी आणणे आवश्यक होते. प्रतिवादीच्या वडीलांनी त्यासाठी प्रतिवादी क्र. १२ च्या हक्कात कुलमुखत्यारपत्र करुन दिले होते. प्रतिवादींनी आज अखेर दावा मिळकतीचे खरेदीखत वादीला करुन दिलेले नाही तसेच प्रतिवादी त्याच्या नावाची नोंद सात बारा पत्रकी असल्याचा गैरफायदा घेवून दावा मिळकतीतील वादीच्या कबजे वहीवाटीस हरकत अडथळा करत आहे व विक्री करण्याचे प्रयत्नात आहे. सबब अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

२ प्रतिवादी क्र. १ ते ११ यांनी नि. ३८ कडे दाव्यास कैफीयत व अर्जास म्हणणे दाखल करुन सर्व कथनांचा इन्कार केला. प्रतिवादीच्या कथनानुसार मयत दगडु कुदळे याने कोणत्याही आर्थिक व प्रामाणिक कुटूंबाकरीता गरज नव्हती. वादातील साठेखताचा संपुर्ण व्यवहार बनावट व बेकायदेशीर आहे. मयत दगडु कुदळे यांनी कधीही दावा मिळकत विक्री करणेसाठी साठेखत किंवा कुलमुखत्यारपत्र करुन दिलेले नाही. सबब वादीच्या हक्कात प्रथमदर्शनी केस नसल्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

३ वादीतर्फे श्री बी. आर. फडके वकील तर प्रतिवादीतर्फे श्री कांबळे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. वादीने नि. ४९ कडे लेखी युक्तीवाद दिलेला असून त्याचे वाचन केले. कागदपत्रांची पडताळणी केली. पुढील मुद्दे उपस्थित होत असून त्याचे निष्कर्ष कारणांसहीत पुढीलप्रमाणे नोंदवत आहे.

| | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १ | वादीस प्रथमदर्शनी केस आहे का ? | अंशतः होकारार्थी |
| २ | वादीचे बाजुने समतोलन आहे का ? | अंशतः होकारार्थी |
| ३ | अर्ज नामंजूर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान संभवते का ? | अंशतः होकारार्थी |
| ४ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणेमिमांसा

**मुद्दे क. १ ते ४ बाबत** :–

४ तुर्तातुर्त मनाई हुकूम ही एक समन्वयी दाद असून ती मिळविण्यासाठी वादीने कोणतीही महत्वपूर्ण बाब न लपवता स्वच्छ हाताने न्यायालयात येणे आवश्यक आहे. वादीच्या कथनानुसार दिनांक १६/४/१९९९ रोजीच्या साठेखताप्रमाणे दावा मिळकत ही तिच्या कबजे वहीवाटीस असून प्रतिवादी हरकत अडथळा करत आहेत. तसेच प्रतिवादी दावा मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात असल्यामुळे मनाई मिळावी अशी मागणी केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात वादीने दिनांक १६/४/१९९९ रोजीचे वादातील साठेखत हजर केले आहे. सदर साठेखत हे बिगर ताब्याचे असे आहे. तसेच मयत दगडु कुदळे यांनी प्रतिवादी क. १२ कैलास शेळके यांना दिनांक २०/१/२००३ रोजी विक्री परवानगी आणणेसाठी कुलमुखत्यारपत्र करुन दिलेले आहे. सदर कुलमुखत्यारपत्र नि. ३ सोबत दाखल केलेले आहे. दावा मिळकतीचा सात बारा पाहता फेर कमांक ६११ प्रमाणे मयत दगडु कुदळे याच्या नावाची नोंद कमी होवून सर्व प्रतिवादींच्या नावाची नोंद वारसा फेर नुसार झालेली आहे. प्रतिवादींनी या प्रकरणात सर्व व्यवहार नाकारलेला आहे. वादीने प्रस्तुतचा दावा वादातील साठेखतानुसार खरेदीखत पुर्ण होवून मिळावे यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी त्यांच्या नावाच्या नोंदीचा गैरफायदा घेवून दावा मिळकत विक्री केल्यास वादीचे अपरिमित नुकसान संभवते. वादीने दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यावरुन

प्रथमदर्शनी दावा मिळकत तिच्या कबजे वहीवाटीत असल्याचे दिसुन येत नाही परंतु साठेखतावरुन खरेदी विक्रीचा व्यवहार झाला असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. सबब वरील सर्व कारणांचा विचार करता दावा मिळकतीच्या संरक्षणासाठी प्रतिवादींविरुध्द मनाई हुकूम केल्यास योग्य होणार आहे. वरीलप्रमाणे मुद्‌दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष अंशत: होकारार्थी नोंदवून मुद्‌दा क्र. ४ साठी पुढील आदेश देत आहे :—

## <u>आदेश</u>

१ वादीचा नि. क्र. ५ चा अर्ज अंशत: मंजूर करणेत येतो.

२ प्रतिवादी क्र. १ ते ११ यांना अशी तुर्तातुर्त मनाई करणेत येते की, त्यांनी दाव्याचा निकाल लागेपावेतो दावा मिळकत कोणासही, कोणत्याही परिस्थितीत विक्री अगर तबदील करणेची नाही.

दिनांक २८/१/२०१६

सुमित वि. जोशी
सह दिवाणी न्यायाधीश क. स्त., दौंड
जि. पुणे

*<u>CERTIFICATE</u>*

*I affirm that, the contents of this PDF order are same word for word as per original order.*

*Name of Steno :- Shri. P. P. Vyavahare, LG Steno.*
*Court Name :- Shri. Sumit V. Joshi Joint Civil Judge J. D. Daund.*
*Date :- 28/1/2016*
*order signed by Presiding Officer on : 28/1/2016*
*order uploaded on : 28/1/2016*